**CNR No :- MHSI100002052018**

-: नियमित दिवाणी मुकदमा क्र. २०/२०१८ :-

-: निशाणी ३६ वरील आदेश :-

प्रतिवादी क्र. १ व २ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या विरुद्ध पारीत झालेला ''विना कैफियत'' चा आदेश रद्दबातल होऊन मिळण्यासाठी केला आहे.

०२. प्रतिवादी क्र. १ व २ चे म्हणणेनुसार, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा दाखल करणे संबंधी कोणतेही कारण घडलेले नसल्याने दावा रद्द करण्याकरीता अर्ज केला होता त्यानंतर प्रतिवादी विरुद्ध दि.२६.०९.२०१८ रोजी विना कैफियत दावा चालविणेचा आदेश पारीत करणेत आला. वादीचा दुरुस्ती अर्ज दाखल होऊन तो मंजुर झाल्याने त्या अनुषंगाने प्रतिवादी यांना त्यांची कैफियत दयावयाची आहे व तसे न झाल्यास प्रतिवादीवर अन्याय होणारा आहे. सबब, प्रतिवादी विरुद्ध पारीत झालेला ''विना कैफियत'' चा आदेश रद्दबातल होऊन मिळण्यासाठी व त्यांची कैफियत सादर करण्यास परवानगी मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाचे कामी वादीतर्फे म्हणणे मागविण्यात आले. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे सादर करुन सदर अर्ज मंजुरीस तीव्र विरोध दर्शविला आहे. वादींच्या म्हणण्यानुसार, वादीने दि.०६.१२.२०२३ रोजी दुरुस्ती केली, प्रतिवादीने ६ वर्षे कैफियत दिलेली नाही. केवळ वादीस न्याय मिळणेस विलंब व्हावा या हेतुने प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे तसेच अर्जात नमुद कारण संयुक्तीक नसल्याने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादींनी अर्जात नमुद केलेले कारण अर्ज मंजुरीस संयुक्तीक व समाधानकारक असल्याचे दिसत नाही. न्यायालयाचा व परीणामी वादीचा अमुल्य वेळ प्रतिवादींच्या या कृत्यामुळे वाया गेलेला आहे. परंतु केवळ विलंब झाला म्हणुन प्रतिवादी क्र. १ व २ ला त्यांची कैफियत सादर करण्याची परवानगी नाकारणे हे नैसर्गीक न्यायतत्वास अनुसरुन होणारे नाही. प्रतिवादीने सादर केलेल्या कैफियतीद्वारे दावा गुणदोषावर निकाली करणेस न्यायालयास मदतच होणारी आहे. प्रतिवादीने केलेल्या विलंबाचे खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन करता येणारे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे पारीत करीत आहे :–

**–:: <u>आदेश</u> ::–**

१. रक्कम रु.१,०००/–(रुपये एक हजार मात्र) खर्चाचे आदेश करुन नि.क्र. ३६ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. सदर खर्चाची रक्कम रु.१,०००/–(रुपये एक हजार मात्र) प्रतिवादी क्र.१ व २ ने वादीस आदा केल्यावर त्यांच्या विरुद्ध पारीत झालेला दि.२६.०९.२०१८ रोजीचा ''कैफियत नाही'' चा आदेश रद्दबातल करण्यात येत आहे.

३. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी पुढील नेमल्या तारखेपर्यंत आदेशाची पुर्तता न केल्यास, सदरचा आदेश स्वयंचलनाने रद्द झाला असे समजण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2024.05.08 13:50:39 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)
दिनांक – ०८.०५.२०२४. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)दोडामार्ग.